# JESUS
# 316

# येशू कोण आहे?

**येशू कोण आहे?** पवित्र शास्त्र आपल्याला या प्रश्नाचे एकमेव खरे उत्तर देते. प्रेषित पौलाने लिहिले, *"प्रत्येक शास्त्रलेख परमेश्वरप्रेरित आहे."* 2 तीमथ्य 3:16. ईश्वरप्रेरित पवित्र शास्त्र, उत्पत्ती ते प्रकटीकरण हया पुस्तकात, शिकवते की येशू हा अनादि काळापासून तो सनातन भविष्यकाळापर्यंतचा परमेश्वर आहे. पवित्र शास्त्र घोषणा करते की तो *"जो आहे, जो होता व जो येणार, जो सर्वसमर्थ, अल्फा व ओमेगा आहे"* प्रकटीकरण 1:8. पवित्र शास्त्र येशूला परमेश्वर, उत्पन्नकर्ता, थोर मेंढपाळ, प्रभु, तारणकर्ता, देवाचा कोकरा, प्रभूंचा प्रभु, राजांचा राजा, इम्मानुएल (आपल्याबरोबर देव), त्राता, महायाजक आणि पुनरुत्थान आणि जीवन म्हणून ओळखते.

**येशू निर्माणकर्ता होता.** *"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता.तोच प्रारंभी देवासह होता. सर्वकाही त्याच्या द्वारे झाले. शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता."* योहान 1:1-14 मधील अवतरणे. *"कारण आकाशात व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले, राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जे काही आहे ते सर्व त्याच्यामध्ये निर्माण झाले; सर्वकाही त्याच्या द्वारे व त्याच्यासाठी निर्माण झाले आहे,"* कलस्सै 1:16-17. मधील उतारे.

**येशू हा "मी आहे" आहे.** प्रभूचा दूत म्हणून येशूने निर्गम 3 (ख्रिस्तपूर्व 1,450) मध्ये जळत्या झुडुपातून मोशेला हाक मारली आणि स्वतःची थोर *"मी आहे"* म्हणून ओळख दिली. योहान 8 मध्ये, येशूने स्वतःची अब्राहामापूर्वी (ख्रिस्तपूर्व 2,100) आणि यहूदी लोकांपूर्वी अस्तित्वात असलेला थोर "मी आहे" असल्याची घोषणा केली. यहूद्यांनी त्याच्याकडे परमेश्वर असल्याचा दावा करणारा या दृष्टीने पाहिले आणि त्याला मृत्युदंड देण्यासाठी दगड उचलले. नंतर, येशूने म्हटले की, *"मी आणि पिता एक आहोत,"* योहान 10:30-31. आणि यहूद्यांनी पुन्हा दगड उचलले.

**येशू जुन्या करारात आहे.** परमेश्वर पित्याला कोणीही पाहिलेला नाही, योहान 1:18, 6:46 तथापि, परमेश्वर जो पूर्व-देहधारी येशू बेथलेहेममध्ये जन्मण्यापूर्वी जुन्या कराराच्या काळात अनेक लोकांना दिसला. तो उत्पत्ती 16 आणि 21 मध्ये हागारला, निर्गम 3 मध्ये मोशेला, शास्ते 6 मध्ये गिदोनाला आणि शास्ते 13 मध्ये शमशोनच्या पालकांना प्रभूच्या दूताच्या रूपात प्रकट झाला. येशू उत्पत्ती 18 आणि 22 मध्ये अब्राहामाला आणि उत्पत्ती 31 आणि 32 मध्ये याकोबालाही प्रकट झाला. आणि यशया 48:12-19 मध्ये (सुमारे 700 ख्रिस्तपूर्व लिहिलेले) येशूचा त्रैक्यामधील एक म्हणून उल्लेख आहे.

**येशू हा एक भाकीत केलेला होता.** शेकडो वर्षांपूर्वीच्या जुन्या करारातील 300 हून अधिक भविष्यवाण्या येशूच्या जन्माचे, जीवनाचे आणि मृत्यूचे वर्णन करतात. स्तोत्र 22 मधील काही भविष्यवाण्या त्याच्या क्रूसावर चढवण्याचे भयानक वर्णन देतात (सुमारे 1,000 ख्रिस्तपूर्व लिहिले गेले होते जेव्हा दगडमार करून मृत्युदंड दिला जात होता). स्तोत्र 22 च्या त्या भविष्यवाण्यांची पूर्णता मत्तय 27 मध्ये नोंदवली आहे.

**येशू मानवरुपी परमेश्वर झाला.** संदेष्टा यशयाने भाकीत केले की, *"आपल्यासाठी एक मूल जन्माला येईल, आपल्याला एक पुत्र दिला जाईल,"* यशया 9:6. यशयाने त्या एका सामर्थ्यशाली परमेश्वराची ओळख पटवून दिली. अनंतकाळचा पुत्र बेथलेहेमात जन्मलेल्या बाळक म्हणून देण्यात आला. येशू त्याच्या जन्माच्या अगोदरपासूनच अस्तित्वात होता - सनातनकाळापासून. "परमेश्वराचा पुत्र" ही पदवी जन्मापेक्षा त्याच्या पदाचे वर्णन करते. याचा अर्थ असा नाही की तो बेथलेहेमात जन्म घेतल्यावर अस्तित्वात आला. प्रेषित पौलाने लिहिले, *"अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले. आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले."* फिलिप्पै 2:5-8. येशू परमेश्वर असतानाही पूर्ण मानव बनला. सनातन, अगोदरच अस्तित्वात असलेला येशू स्वर्गातून मानव बनण्यासाठी खाली आला, योहान 3:13, 31, योहान 6:33-38. येशू एकाच वेळी परमेश्वर आणि मानव दोन्हीही होता.

**येशूने अद्भुत कार्ये केली.** त्याची पुष्कळ अद्भुत कार्ये नवीन करारात आढळतात. त्याच्या दाव्यांसह तीन नाट्यमय अद्भुत कार्ये होती. त्याने आश्चर्यकारकरित्या 5,000 लोकांना जेवू घातले आणि नंतर म्हटले, *"मीच जीवनाची भाकर आहे,"* योहान 6:35. त्याने एका अंध माणसाला बरे केले, *"मी जगात आहे तोपर्यंत मी जगाचा प्रकाश आहे,"* असे म्हटल्यानंतर, योहान 9:1-8. आणि तो म्हणाला, *"पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल,"* योहान 11:25. मग येशू त्याचा मित्र लाजर याच्या कबरेकडे चालत गेला, जो चार दिवसांपासून मृत होता आणि त्याने त्याला पुन्हा जिवंत केले. येशूने आजारी, अपंग, बहिरे, मुके, कुष्ठरोगी आणि ग्रस्तांना बरे केले. त्याने पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर केले, तो पाण्यावर चालला आणि त्याने समुद्र शांत केला. मत्तय 9:2-7 मध्ये अशा लोकांबद्दल सांगितले आहे ज्यांनी एका पक्षाघाती माणसाला येशूकडे आणले.

तो त्या माणसाला म्हणाला, *"मुला, धीर धर; तुझ्या पापांची क्षमा झाली आहे."* धार्मिक पुढाऱ्यांना वाटले की ती ईश्वरनिंदा आहे कारण फक्त परमेश्वरच पापांची क्षमा करू शकतो. येशूने त्यांना विचारले, *"कारण 'तुझ्या पापांची क्षमा झाली आहे' असे बोलणे, किंवा 'उठून चाल 'असे बोलणे, ह्यांतून कोणते सोपे?' तथापि मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे तुम्हांला समजावे म्हणून (मग तो पक्षाघाती मनुष्याला म्हणाला) ऊठ, आपली बाज उचलून घेऊन घरी जा." मग तो उठून आपल्या घरी गेला.*

**येशूने सिद्ध केले की तो परमेश्वर आहे.** येशूने त्याचा जन्म, जीवन आणि मरणाबद्दल जुन्या करारातील भविष्यवाण्या पूर्ण केल्या. तो परमेश्वर आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याने अनेक अद्भुतकृत्ये केली. तो अधिकारावाणीने शिकवत असे. *"येशूने हे सर्व बोलणे समाप्त केल्यावर असे झाले की, लोकसमुदाय त्याच्या शिक्षणावरून थक्क झाले; कारण तो त्यांना त्यांच्या शास्त्री लोकांसारखा नव्हे तर अधिकारवाणीने शिकवत होता,"* मत्तय 7:28-29. आणि तो पापरहित जीवन जगला, इब्री लोकांस 4:15, 1 पेत्र 2:22, 1 योहान 3:5. येशू, निष्कलंक मानवरुपी परमेश्वर म्हणून, आपल्या पापांसाठी वधस्तंभावर बलिदान देणारा परमेश्वराचा सिद्ध कोकरा बनला. *"त्याने स्वतः आपली पापे वधस्तंभावर त्याच्या शरीरावर वाहून नेली, यासाठी की आपण पापासाठी मरावे आणि नीतिमत्त्वासाठी जगावे,"* 1 पेत्र 2:24.

**येशूला वधस्तंभी खिळण्यात आले आणि तो मेलेल्यांतून उठला.** *"कारण वाडवडिलांच्या परंपरेने चालत आलेल्या तुमच्या निरर्थक वागणुकीपासून, 'सोने व रुपे' अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने तुम्ही मुक्त झाला आहात,"* 1 पेत्र 1:18-19. *"त्यांनी त्याला खांबावर टांगून मारले; पण त्याला देवाने तिसऱ्या दिवशी उठवले व त्याने प्रकट व्हावे असे केले - त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात,"* प्रेषितांची कृत्ये 10:39-40, 43. *"मला जे सांगण्यात आले ते मी तुम्हांला सांगून टाकले, त्यांपैकी मुख्य हे की, शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्या-आमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्राप्रमाणे तिसर्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले,"* 1 करिंथ 15:3-4. येशू कबरेतून उठला आणि परत स्वर्गास जाण्यापूर्वी अनेक साक्षीदारांनी त्याला पाहिले.

**येशू हा परमेश्वराकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे.** येशूने म्हटले, *"मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही"* योहान 14:6. प्रेषित पेत्र म्हणाला, *"तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही"* प्रेषितांची कृत्ये 4:12. प्रेषित पौलाने लिहिले, *"कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे"* 1 तीमथ्य 2:5-6. परमेश्वराकडे जाण्याचा येशूचा मार्ग इतर सर्व धर्मांपेक्षा वेगळा आहे. ते आपल्या पापाच्या समस्येवर कोणताही उपाय देत नाहीत. ते शिकवतात की जर तुम्ही सामान्यतः तुमच्या चांगल्या आणि वाईटाच्या विविध परिभाषांनुसार चांगले केले तर देव पापाकडे दुर्लक्ष करतील आणि स्वर्गात प्रवेश देतील. येशूचा मार्ग असा आहे की त्याच्यावर विश्वास ठेवल्याने तुमच्या पापांची किंमत वधस्तंभावर मोजली गेली आणि तुमची पापे क्षमा केली गेली. येशूसोबत तुम्ही स्वर्गात जाल. *"देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."* योहान 3:16.

**येशू परत येईल.** येशू म्हणाला, *"माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मी तुम्हांला तसे सांगितले असते; मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. आणि मी जाऊन तुमच्यासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी की, जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे"* योहान 14:2-3. आणि पवित्र शास्त्राच्या शेवटच्या वचनांत, येशूने म्हटले, *"होय, मी लवकर येतो."* प्रेषित योहानाने पुढे म्हटले, *"आमेन. ये, प्रभु येशू ये,"* प्रकटीकरण 22:20-21. जर येशू आज परत आला तर तुम्ही त्याला भेटण्यास सज्ज आहात का? येशूवर विश्वास ठेवून आणि परमेश्वराकडून क्षमा मिळवून तुम्ही त्याला भेटण्यास तयार आहात याची खात्री करण्यासाठी www.Gospel316.org ला भेट द्या.

**येशू हा अनादी काळापासून सनातन भविष्यकाळापर्यंतचा परमेश्वर आहे.**

**त्याच्या नामाचा उल्लेख ऐकून आश्चर्यचकित व भयचकित व्हा!**

जॉन डी. मॉरिस तृतीयद्वारे लिखित *येशू कोण आहे?* © 2025 हे पुस्तक अॅक्ट्स वन एट यांनी प्रकाशित केले आहे. तुम्ही त्यातील माहिती मजकूर न बदलता आणि हयातील संपूर्ण निवेदन समाविष्ट करण्याची अनिवार्यता लक्षात घेत मोफत छापू शकता, प्रत तयार करू शकता, डाकद्वारे पाठवू शकता, ई-मेल करू शकता किंवा संदेशाद्वारे पाठवू शकता तुम्ही पहिल्या पानाच्या वरच्या भागात तुमच्या सेवासंस्थेचे किंवा मंडळीचे नाव व लोगो लावू शकता. तसेच दुसऱ्या पानाच्या खालच्या बाजूस असलेल्या आडव्या रेषेच्या वर तुमची संपर्क माहिती जोडू शकता. Jesus316 हे केवळ बायबलवर आधारित आहे. याचे उद्दिष्ट आहे लोकांना येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यात मदत करणे आणि त्यानंतर त्याचे शिष्य म्हणून वाढण्यासाठी मार्गदर्शन करणे. तुम्ही Acts One Eight ला (शक्य असल्यास इंग्रजीत) Hello@Mail316.org वर ई-मेल करू शकता. इंग्रजी नसलेल्या आवृत्त्यांसाठी भाषांतर सेवा www.ChristianLingua.com द्वारे प्रदान केल्या गेलेल्या आहेत. *येशू कोण आहे?* हे 48 भाषांमध्ये www.Jesus316.org वर मोफत उपलब्ध आहे. इंग्रजी आवृत्तीतील बायबलचे कोटेशन द लॉकमन फाउंडेशनच्या न्यू अमेरिकन स्टँडर्ड बायबल 1995 मधील आहेत. या भाषांतरात दिलेली बायबलमधील अवतरणे बायबल सोसायटी ऑफ इंडियामधून घेतलेली आहेत.